# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. ३२४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०६/२०१८

**१) शेतीचे वादावरून भांडण करून कुऱ्हाडीने मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक २५/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने दि.२४/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान फिर्यादीचे पतीस भेटुन ' तु मला न विचारता वडीलोपार्जीत शेती बटईने का दिली' म्हणुन भांडण केले फिर्यादी ही भांडण सोडवीण्यास गेली असता, तीला सुध्दा ढकलढुकल करून शिवीगाळ केली यातील आरोपीने नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीस भेटुन ' तु मला का मारलीस म्हणुन भांडण करून कुऱ्हाडीचे दांडयाने डोक्यावर व डावे हातावर मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. अनिता अवदुत सेलोटे वय ४२ वर्ष रा. कोच्ची हिचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२५,३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) संगनमत करून शेतीच्या वादावरून भांडण करून कुऱ्हाड व पावडयाने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक २०/०६/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस आपले शेतातील माती राफडीने आमच्या बाजुला का टाकलास याच कारणा वरून भांडण करून कुऱ्हाड व पावडयाने डावे हाताचे भुजेवर व तोंडावर मारून जखमी केल्याने फिर्यादी नंदलाल सखाराम चांदेवार वय ५५ वर्ष रा. गोंडउमरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चांदेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) शिवीगाळ करून काठीने मारून गुन्हा नोंद: –**

दिनांक २५/०६/२०१८ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा घरी हजर असतांना यातील आरोपीने फिर्यादीचे कुंपन उधळुन फिर्यादीचे अंगावर फेकले म्हणुन फिर्यादीने आरोपीस हटकले असता त्यास शिवीगाळ करून काठीने फिर्यादीचे उजवे हाताच्या कोनीला व डाव्या पायाला मारून जखमी केल्याने सरतर्फे पोना. साठवणे यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,४०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनघटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद: –**

दिनांक २५/०६/२०१८ चे १८.१५ ते १८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आरोपीचे घरी कामानीमीत्ताने गेली असता आरोपी क्र. २ याने शरीर सुखाची मागणी केली व फिर्यादीचे हात धरून विनयभंग केला व आरोपी क्र. १ याने फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(अ),५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परसुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

५) निष्काळजीपणे वाहन चालवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद:–

दिनांक २५/०४/२०१८ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हयगयीने, लापरवाहीने व नष्काळजीपणे वाहन मागे घेत असतांनी गोडावुन जवळील ग्राऊंड जवळ झोपलेला इसम नामे दलीराम वाहने वय ४३ वर्ष रा. पेंढरी याचे दोन्ही पायावरून कन्डक्टर साईडचे मागील चाक गेल्याने जखमी झाला. फिर्यादी सौ. लीलाबाई प्रल्हाद भेंडवाडे वय ६९ वर्ष रा. कारधा हिचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गाडवे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक २५/०६/२०१८ चे १६.३० ते १७.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पीवळी गाडी ही शिवीजी टी पांईट लाखंदुर येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभी करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. साठवणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. साठवणे पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

७) अवैध हातभट्टी/देशी दारु/जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक २५/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन आंधळगाव,गोबरवाही,साकोली, व भंडारा येथे अवैध हातभट्टी/ देशी दारु /जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु+साहीत्य किंमती ८७०/–रु, व ०२ लिटर ७०० मिली लिटर देशी किंमती ८०४/–रु. तसेच किमती ४४१५/रु. असा एकुण किंमती ६,०८९/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

०८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०२ तीन सिटर वाहनाकरीता– १६ ईतर वाहनांवरती – १०७ केसेस करण्यात आले आहे.

(एस.बी.ताजणे)
प्रभारी पोलीस उपअधीक्षक (गृह )
दुरध्वनी.क्र. ९५४५९९७०२५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.